# मजनू गोविंद बर्गेच्या आत्महत्येला लैला पूजाच कारणीभूत?
# सखोल तपासातून वैराग पोलिस पोचले अखेर निष्कर्षापर्यंत!

- चॅटिंग, कॉल डिटेल्स, खरेदीदस्त, बँक डिटेल्स, लोकेशनवरुन आत्महत्येचे गूढ उकलत चालले
- प्रियकरास झोंबाडणं नर्तिका गायकवाडच्या प्रचंड अंगलट
- आत्महत्येस पूजा कारणीभूत ठरण्याचे ठोस पुरावे मिळवण्याचा वैराग पोलिसांचा घाट
- मतलबी वृत्तीमुळे ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर पूजा सडू शकते तुरुंगात

✔ सोलापूर/ शिवाजी भोसले

**राज्यभरात खळबळ उडवून देणारं नर्तिकी पूजा गायकवाड प्रकरण आता महत्त्वाच्या निष्कर्षाच्या टप्यावर आलं आहे. पोलिस कोठडीदरम्यान संशयित आरोपी आणि प्रेम प्रकरणातील लैला पूजा गायकवाड हिच्याकडून मिळालेली माहिती आणि गोविंद बर्गे यांच्या आत्महत्येच्या घटनेच्या अनुषंगाने, वैराग पोलिसांकडून मिळवत जात असलेले सबळ आणि ठोस पुरावे यावरुन बीड जिल्ह्यातील लुखामसला गावचे माजी उपसरपंच गोविंद बर्गे यांच्या आत्महत्येस त्यांची प्रेयसी पूजा गायकवाड हिच कारणीभूत असल्याच्या निष्कर्षापर्यंत वैराग पोलिस पोचले आहेत. मोबाईल चॅटिंग, कॉल डिटेल्स, खरेदीदस्त, बँक डिटेल्स, लोकशन तसेच काही महत्त्वाच्या साक्ष यावरुन बर्गेच्या आत्महत्येचे गूढ उकलत चालले असून या माहिती आधारेच मृत गोविंदच्या आत्महत्येच्या कारणाच्या मुळाशी पोचता येत असल्याचे वैराग पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ सुत्रांकडून रविवार (ता.१४) दैनिक 'सुराज्य' सांगण्यात आले.**

दरम्यान प्रेमसंबंधाच्या टप्यावर गोविंद बर्गेंची केलेली फसवणूक, मालमत्तेवर तगादा, तसेच ब्लॅकमेलिंग करणं या सगळ्याबाबी प्रेयसी पूजा हिच्या अंगलट आली असून अवघ्या २१ वर्षाच्या आणि ऐन तारुण्याच्या हिंदोळ्यावर झुलवे घेणाऱ्या पूजाला प्रियकर बर्गेंच्या आत्महत्येला कारणीभूत ठरण्यावरुन शिक्षा लागू शकते, त्यातून तिला जेलमध्ये सडावं लागेल, अशा प्रतिक्रिया कायदे तज्ज्ञांकडून 'सुराज्य'कडे व्यक्त केल्या गेल्या.

विशेषत्वे, प्रेम प्रकरणात आंधळ्या झालेल्या, प्रेयसी पूजापायी मानसिक ताणतणावात जाऊन स्वत:ला कायमचे संपविलेल्या मृत गोविंद आणि त्यांच्या नातेवाईकांना न्याय मिळवून देण्याच्या अनुषंगाने, या गुन्ह्यात पूजा हिला कठोर शिक्षा लागण्याच्या पार्श्वभूमीवर, सबळ पुरावे वैराग पोलिसांकडून जमा केले जात असल्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी दै. 'सुराज्य' ला सांगितले.

नर्तकी पूजा गायकवाड हिच्यासोबत असलेल्या प्रेमसंबंधातून झालेली फसवणूक, मालमत्तेवर तगादा, तसेच ब्लॅकमेलिंगच्या प्रकारामुळे गोविंद यांनी बार्शी तालुक्यातील सासुरे येथे येऊन संशयित आरोपी पूजा हिच्या घरासमोर येऊन थेट स्वत:वर गोळी झाडून आपली जीवनयात्रा संपवली. या प्रकरणी पोलिसांनी पूजा गायकवाडला अटक केली असून, तिची कसून चौकशी सुरू आहे. चौकशी दरम्यान



अनेक अँगल लावले. पूजा आणि मृत गोविंद यांचे मोबाईल कॉल्स, चॅटिंग, लोकशन, खरेदीदस्त, बँक डिटेल्स आदींची पडताळणी तपास अधिकारी यांच्याकडून अद्यापही सुरु आहे.


आपमतलबी किंबहुना अत्यंत स्वार्थीवृत्तीच्या पूजा हिने मृत गोविंद यांना रोख रक्कम, प्लॉट, मोबाईल, बुलेट, सोने आदीबाबतीत झोंबाडलं होतं, हे उपब्लध माहितीवरुन सिद्ध होत असल्याचं कळतं. त्याशिवाय मृत गोविंद यांनी एवढी 'माया' ओतूनदेखील तिने प्रेमसंबंध ब्रेकअप् केले. त्यातून गोविंद हे अधिकच मानसिक ताणतणावात गेले, त्यातून त्यांनी स्वत:ला संपविण्याचा अत्यंत टोकाचा निर्णय घेतला, असा अन्वयार्थ, याप्रकरणाच्याबाबतीत निघत असल्याचे सांगण्यात आले.

### पोलिस कोठडीत पूजला मिळतेय व्हीआयपी ट्रिटमेंट, मृत गोविंद बर्गेच्या नातेवाईकांचा पोलिसांवर आरोप

पोलीस कोठडीमधील पूजा गायकवाड हिला इतर आरोपींच्या तुलनेत व्हीआयपी ट्रिटमेंट खुद्द पोलिसांकडूनच मिळत असल्याचा आरोप मृत गोविंद यांचा मेहुणा लक्ष्मण चव्हाण (जालना) यांच्यासह घरातील सदस्यांबरोबरच काही सामाजिक कार्यकर्त्यांचा आहे. खानावळीमधील उत्कृष्ट पद्धतीच्या पदार्थांचा डबा, प्यायला मिनरल वॉटर, फळे, वडापाव, चहा-कॉफी असं सगळं खुद्द पोलिस पुरवत आहेत, असा दावादेखील त्यांच्याकडून केला जात आहे. यावरुन पोलिसांच्या कर्तव्यावर प्रश्न चिन्ह आलं आहे.

❝ संशयित आरोपी पूजा गायकवाड या तरुणीच्याबाबतीत वैराग पोलिसांवर तिच्या नातेवाईकांकडून करण्यात आलेले आरोप तथ्यहीन आहेत. पूजा हिला इतर आरोपींप्रमाणे पोलिसांनी वागणूक दिली. व्हीआयपी ट्रिटमेंट वगैरे काही देण्याचा प्रकार झालेला नाही, त्याशिवाय तिला कोणाला भेटू दिलेले नाही. जबाब घेण्यासाठी कला केंद्रातील तिच्या काही मैत्रिणी आल्या होत्या. तेवढ्याच भेटल्या.

**- कुंदन गावडे,** पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे वैराग (ता.बार्शी)



### थिएटर चालक म्हणताहेत, साहेब काय पण करा, पण पूजा सुटली पाहिजे...

पोलिसांनी माहिती घेण्यासाठी रविवारी संगितबारी थिएटर मालकांना बोलावले होते. तपास अधिकारी यांनी त्यांना अपेक्षित माहिती या मालकांकडून घेतली. दरम्यान या मालकांनी निरोप घेताना विनंती केली की, 'साहेब काय पण करा, पण पूजा सुटली पाहिजे'

### लाडक्या पूजावर भलतेच प्रेम, चाहत्यांना हाकलण्याची पोलिसांना डोकदुखी

मृत गोविंदच्या आत्महत्येप्रकरणात संशयित आरोपी म्हणून पूजा हिला ताब्यात घेतल्यापासून आजतागयतपर्यंत तिच्या चाहत्यांनी वैराग पोलीस ठाण्याची वाट पांढरी केली. जेवणाच्या डब्यांचे पार्सल, वडा पाव, नाश्त्यांचे पदार्थ, मिनिरल वॉटर असं बरंच काही लाडक्या पूजासाठी तिचे चाहते घेऊन येत असल्याचे समजतं. संशयित आरोपी पूजा हिने बरीच 'माया' ओतण्याची तयारी दर्शवली असावी म्हणून तिच्या सेवेसाठी सेवेधारी चाहते वैराग पोलीस ठाण्यात येत असल्याचं कळतं.

### 'साहेब, पूजाला तेवढा सॉफ्ट कॉनर्र द्या बर का' अनेक चाहत्यांचा पोलिसांसमोर लाळघोटेपणा

आत्महत्येस प्रवृत्त करण्याच्या गुन्ह्यातील संशयित आरोपी पूजा वैराग पोलिस ठाण्याच्या कोठडीत आहे. तिला भेटण्यासाठी अनेक ठिकाणाहून रोजच तिचे चाहते मोठ्या संख्येने येत आहेत. तिला तोंड दाखवण्यासाठी त्यांच्या जीवाची अक्षरश: घालमेल होत आहे. 'साहेब, पूजाला तेवढा सॉफ्ट कॉनर्र द्या बर का' अशी विनवणी हे चाहते पोलिसांकडे लाळघोटेपणान करीत असल्याचा बोलबाला आहे.



### वाढीव पोलीस कोठडी मागणीचा निर्णय आज सकाळी

गोविंद बर्गे यांच्या आत्महत्या प्रकरणात संयशित पूजा हिचा तपास कुठपर्यंत आला आहे. तिने तपासात सहकार्य केले का? पोलीस कोठडी घेऊन तिच्याकडून आणखी कोणती माहिती मिळवायची आहे का?, तपासाच्या दृष्टिने तिच्या पोलीस कोठडीची गरज किती आहे. हे सगळं आज सोमवारी (ता.१५) सकाळी पाहिले जाईल. तपास अधिकारी यांच्याकडून एकूणच माहिती घेऊन पोलीस कोठडी मागायची की नाही हे ठरल जाईल अस पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त



आग लागल्यानंतर शोरूमची झालेली अवस्था.

### वाहनाच्या शोरूमला आग लागून लाखो रुपयांचे नुकसान

✔ **सोलापूर :** होटगी रोडवरील सिद्धी सुझूकी शोरुम व बजाज शोरुमला रविवारी भीषण आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले मात्र जीवितहानी झाली नाही. रविवारी दुपारी दोन वाजता सुमारास सुरुवातीला बजाज शोरूमला ही आग लागली. ही आग पसरत जाऊन नजीकच्या सुझुकी शोरूमने देखील पेट घेतला.आग लागताच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. यावर तातडीने अग्निशमन दलाचा बंब घटनास्थळी दाखल झाला. दरम्यान या आगीत काही दुचाकी वाहने आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. या शोरूममध्ये असलेल्या ऑइलमुळे आग जास्त भडकल्याचे सांगण्यात आले. ही आग भडकतच जाऊन संपूर्ण शोरूम पेट घेतला. आगीच्या उंच ज्वालामुळे धुराचे लोट आकाशात पसरले होते. घटनास्थळी बघायची मोठी गर्दी झाली होती.दरम्यान आग कशामुळे लागली व नुकसान की किती झाले याची निश्चित माहिती मिळू शकली नाही. अग्निशमन दलाच्याएकूण आठ बंबाच्या सहाय्याने ही आग विझवण्यात आली. याआगीमध्ये कोणतीही जिवितहानी झाली नाही,अशी माहिती महापालिका अग्निशामक दलाचे प्रभारी अधीक्षक अच्युत दुधाळ यांनी दिली.

### कोल्हापूर-कलबुर्गी ट्रेनच्या होणार ११६ फेऱ्या

✔ **सोलापूर :** रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना एक आनंदाची बातमी दिली आहे. आगामी दसरा-दिवाळी सणांच्या काळात प्रवाशांची होणारी अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने सोलापूर विभागातून कोल्हापूर ते कलबुर्गी दरम्यान विशेष गाडीच्या ११६ फेऱ्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सणाच्या काळात प्रवाशांचा प्रवास सुखकर होणार आहे. प्रवाशांनी वैध तिकिटांसह प्रवास करून विशेष सेवेचा लाभ घ्यावा, अशी विनंती रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आली आहे. नोकरी आणि व्यवसायानिमित्त आपल्या मूळ गावापासून दूर राहणारे लोक सणासुदीच्या काळात आपापल्या गावी जातात. त्यामुळे सणाच्या काळात प्रवाशांची गर्दी वाढते. गर्दीच्या काळात प्रवाशांची गैरसोय होऊ नये, म्हणून रेल्वे प्रशासनाने विशेष ट्रेन सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

## एकाही नकली व्यक्तीला येता येणार 'ओबीसी'त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी भूमिका केली स्पष्ट

- ओबीसींवर गदा येणार नसल्याचा पुनरुच्चार
- टोकाच्या राजकारणामुळे समाजाचा भलं होत नसल्याचं विधान

✔ मुंबई/प्रतिनिधी






राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून चांगलंच राजकारण तापलं आहे. यातच काही दिवसांपूर्वी कुणबी नोंद असलेल्या मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी अध्यादेश काढला. या अध्यादेशामुळे ओबीसी आक्रमक झाले. सरकारच्या अध्यादेशामुळे ओबीसींवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली जात असून ओबीसी आणि मराठा समाज आमने-सामने येत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, या सर्व घडामोडींवर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच राज्य सरकारच्या २ सप्टेंबर रोजीच्या अध्यादेशानुसार कुणबी प्रमाणपत्र नेमकं कोणाला मिळणार? सरसकट कुणबी दाखले दिले जातील का? या सर्व विषयांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच एकही नकली व्यक्ती ओबीसीमध्ये समाविष्ट होणार नाही, असं सांगत सरकारचा हा अध्यादेश ओबीसींवर गदा आणणारा नसल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

ओबीसींचं वेगळं मंत्रालय आणणारे आम्ही आहोत, ओबीसींसाठी योजना तयार करणारे आम्ही आहोत, महाज्योती तयार करणारे आम्ही आहोत, ओबीसींना ४२ वसतिगृह देणारेही आम्ही आहोत. उद्धव ठाकरे यांच्या सरकारने ओबीसींचं राजकीय आरक्षण घालवलं, पण ते आरक्षण आम्ही परत आणलं. २७ टक्के पूर्ण ओबीसींचं आरक्षण परत आणणारं आमचं सरकार आहे. त्यामुळे ओबीसींना देखील हे माहिती आहे की त्यांचं हित पाहणारं कोण आहे. विरोधकांना फक्त राजकारण करता येतं. मात्र, आम्ही ओबीसी समाजाचं हित पाहतो. आम्ही मराठा समाजाचंही हित पाहतो. सर्व समाजाचं हित पाहणारं आमचं सरकार आहे, असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं.

### कुणबी प्रमाणपत्र कोणाला मिळणार?

मुख्यमंत्री म्हणाले, मला असं वाटतं की जोपर्यंत दोन्ही समाजातील नेते खरी वास्तविकता काय आहे? हे समाजापर्यंत पोहोचवणार नाहीत तो पर्यंत दोन्ही समाजातील तेढ कमी होणार नाही. मी सांगतो की ज्यांच्याकडे कुणबी नोंदी आहेत, त्यांनाच कुणबी प्रमाणपत्र मिळेल. कुणबी नोंद नसेल तर कुणबी प्रमाणपत्र मिळणार नाही. त्यामुळे ओबीसी समाजाने चिंता करण्याची गरज नाही. पण ओबीसी आरक्षण संपलंय अशा प्रकारचं वातावरण तयार केलं जातंय, त्याचा मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होत आहे. दुसरीकडे टोकाचं राजकारण सुरू आहे. पण अशा प्रकारच्या राजकारणामुळे कधीही समाजाचं भलं होऊ शकत नाही. आम्ही समाजाची काळजी घेत आहोत, असंही मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## बोगस IAS पूजा खेडकर कुटुंब पुन्हा वादात; अपहरण झालेली व्यक्ती खेडकरांच्या घरात सापडल्याने खळबळ

✔ मुंबई/प्रतिनिधी



पूजा खेडकर

**खेडकर प्रकरणाची पुन्हा चर्चा**

वादग्रस्त आयएएय पूजा खेडकर यांचे कुटुंब पुन्हा चर्चेत आले आहे. नवी मुंबईतून अपहरण झालेला ट्रकचा हेल्पर खेडकर यांच्या पुण्यातील घरात सापडल्याने खळबळ उडाली आहे.या प्रकारामुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, अपहरण झालेला हेल्पर खेडकर कुटुंबाच्या घरात कसा पोहोचला? या व्यक्तिचा खेडकर कुटुंबाशी काय संबंध? या सर्व घटनांची चौकशी नवी मुंबई पोलिसांनी सुरू केला आहे.

आयएएस पूजा खेडकर यांची केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून झालेली नियुक्ती वादात सापडली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे ही नियुक्ती झाल्याचा ठपका आहे. हा वाद देशभर गाजला. यानंतर खेडकर कुटुंब आणि त्यांच्याभोवती असलेले वाद नेहमीच चर्चेत राहिले. आता पुन्हा खेडकर कुटुंब वेगळ्याच घटनेने चर्चेत आले आहे. नवी मुंबई पोलिस झालेल्या घटनेशी बारकाईने तपास करत असल्याने खेडकर कुटुंबियांची भूमिका चर्चेत आली आहे.

मुलुंड ते ऐरोली मार्गावर सिमेंट मिक्सर ट्रक आणि कारचा शनिवारी सायंकाळी अपघात झाला. ट्रकचालक चंदकुमार चव्हाण आणि त्याचा हेल्पर प्रल्हाद कुमार हे दोघे ट्रकामध्ये होते. कारमध्ये दोन व्यक्ति होत्या. अपघातानंतर दोन्ही बाजूने वाद झाला. ट्रकमधील हेल्पर प्रल्हाद कुमार याला कारमधील दोघांनी जबरदस्तीने त्यांच्यासोबत बसून घेतले.

यानंतर कारमागे ट्रक आणण्याच्या सूचना ट्रक चालक चंदकुमार याला केल्या. ट्रक चालक कारमागे ट्रक घेऊन चालला होता. पण पुढे काही वेळाने कार ट्रक चालकाच्या नजरेआड झाली. या प्रकाराने गोंधळलेल्या ट्रक चालक चंदकुमार याने मालक विलास ढेंगरे यांना दिली. ढेंगरे यांनी नवी मुंबईच्या रबाळे पोलिस ठाण्यात धाव घेत अपहरणाची तक्रार दिली.

पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ तपास सुरू केला. कारचा शोध घेतला. ही कार पुण्यात पूजा खेडकर यांच्या कुटुंबाच्या घरी उभी असल्याची माहिती मिळाली. नवी मुंबई पोलिसांचे पथक कारवाई करत तिथं पोचले. तेव्हा पूजा खेडकर यांच्या आईने घराचे प्रवेशद्वार उघडण्यास नकार दिला. पोलिसांनी मात्र कारवाई सुरूच ठेवली. यानंतर खेडकर कुटुंबांच्या घरातून ट्रक हेल्पर प्रल्हाद कुमार समोर आला. त्याची पोलिसांनी सुटका केली.

### ट्रक हेल्पर प्रल्हाद खेडकरांच्या घरी पोचला कसा?

नवी मुंबईतून अपहरण झालेल्या ट्रक हेल्पर प्रल्हाद कुमार खेडकर कुटुंबांच्या घरी कसा पोहोचला या प्रश्नाबरोबर अनेक गंभीर मुद्दे या घटनेमुळे खेडकर कुटुंबाभोवती उपस्थित झाले आहेत. अपघातामधील कार कशी ताब्यात आली? कार चालवणारे दोघे कोण होते? खेडकर कुटुंबांशी त्यांचा काय संबंध? या घटनेची खेडकर कुटुंबांचे काय कनेक्शन? अने अनेक प्रश्न या घटनेमुळे खेडकर कुटुंबाभोवती नवी मुंबई पोलिसांनी उभे केले आहे.

### पोलिसांकडून वेगाने तपास सुरु

खेडकर कुटुंब वेगवेगळ्या अडचणीने राज्यभर चर्चेत आहेत. आता पुन्हा एकदा अपहरण प्रकरण समोर आल्याने खेडकर कुटुंबाची या प्रकरणात नेमकी काय भूमिका आहे, याचा नवी मुंबई पोलिसांनी तपास सुरू केला आहे. हे प्रकरणामुळे वादग्रस्त खेडकर कुटुंबांच्या पुन्हा अडचणी वाढण्याची शक्यता आ